पोलीस आयुक्त, पुणे शहर यांच्या आस्थापनेवर निर्माण केलेले पोलीस निरीक्षक, गणकयंत्र यांचे ०१ पद अपर पोलीस महासंचालक, गुन्हे अन्वेषण विभाग, पुणे यांच्या आस्थापनेवर वर्ग/स्थानांतरीत करण्याबाबत...

महाराष्ट्र शासन

गृह विभाग

शासन निर्णय क्रमांकः अेपीओ-०८१८/प्र.क्र.१७/पोल-३

मंत्रालय, दुसरा मजला, मुख्य इमारत

मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई

दिनांक : २२ फेब्रुवारी, २०१८.

वाचा :-

१) गृह विभाग शासन निर्णय क्र.एमएसओ-१२७४/२६-III-पी, दि.०८.०४.१९७६.

२) गृह विभाग शासन निर्णय क्र.एमओएस-०१९४/४७/(२)/पोल-४, दि.०३.०६.१९९५.

३) वित्त विभाग, शासन निर्णय क्र.संकीर्ण-२०१५/प्र.क्र.४१/अर्थ-१, दि.०२.०६.२०१५.

४) अपर पोलीस महासंचालक (नि. व स.), पोलीस महासंचालक कार्यालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे पत्र क्र.पोमसं/२६-ब/पुणे शहर/गणकयंत्र/४२/२०१७, दि.१३.१०.२०१७.

प्रस्तावना :-

गणकयंत्र विभाग, मुंबई करीता उपरोक्त संदर्भाधिन क्र.०१ येथे नमूद दिनांक ०८.०४.१९७६ अन्वये पोलीस निरीक्षक, गणकयंत्राची ०९ पदे निर्माण करण्यात आली असून व सदर पदांचे वेतन व भत्ते कोणत्या मुख्यालयातून काढण्यात यावे याबाबतची माहिती शासन निर्णयासोबतच्या विवरणपत्रात नमूद केली आहे. उपरोक्त संदर्भाधिन क्र.२ येथे नमूद दिनांक ०३.०६.१९९५ च्या शासन निर्णयान्वये पोलीस अधीक्षक, गणकयंत्र हे कार्यालय अपर पोलीस महासंचालक, गुन्हे अन्वेषण विभाग, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्या अधिपत्याखाली हस्तांतरीत करण्यात आले आहे. पोलीस निरीक्षक, गणकयंत्र यांच्या ०९ पदांपैकी पोलीस निरीक्षक, गणकयंत्र या एका पदाचे केवळ वेतन व भत्ते पोलीस आयुक्त, पुणे शहर यांच्या आस्थापनेवरुन अदा करण्यात येतात. पोलीस निरीक्षक, गणकयंत्र यांची नेमणुक पोलीस आयुक्त, पुणे यांच्या आस्थापनेवर नसल्याने त्यांच्यावर पोलीस आयुक्तांचे नियंत्रण राहत नाही. त्यामुळे सदरचे पद कायमस्वरुपी अपर पोलीस महासंचालक, गुन्हे अन्वेषण विभाग, पुणे यांच्या आस्थापनेवर वर्ग करणेबाबत अपर पोलीस महासंचालक (नि. व स.), पोलीस महासंचालक कार्यालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी उपरोक्त संदर्भाधिन क्र.४ येथे नमूद दिनांक १३.१०.२०१७ च्या पत्रान्वये विनंती केली आहे. त्यानुषंगाने शासनाने खालीलप्रमाणे निर्णय घेतला आहे.

शासन निर्णयः-

पोलीस आयुक्त, पुणे शहर यांच्या आस्थानेवर उपरोक्त संदर्भाधिन क्र.१ येथे नमूद दिनांक ०८.०४.१९७६ च्या शासन निर्णयान्वये निर्माण करण्यात आलेले पोलीस निरीक्षक, गणकयंत्र यांचे ०१ पद अपर पोलीस महासंचालक, गुन्हे अन्वेषण विभाग, पुणे यांच्या आस्थापनेवर वर्ग/स्थानांतरीत करण्यास शासन मान्यता देण्यात येत आहे.

२. सदर शासन निर्णय वित्त विभाग शासन निर्णय क्र.संकीर्ण-२०१५/प्र.क्र.४१/अर्थ-१, दि.०२.०६.२०१५ अन्वये विभागास प्रदान करण्यात आलेल्या अधिकारनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

३. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१८०२२२१७५१२३०२२९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Dhiraj K Abhang

Digitally signed by Dhiraj K Abhang
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Home Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=b83edfcbaa0fddb5983e8303bccd9a96ef7cc55853b8b449ff8dc53d69f1618d, cn=Dhiraj K Abhang
Date: 2018.02.22 17:51:51 +05'30'

(धीरज कां. अभंग)
कार्यासन अधिकारी, गृह विभाग

प्रत,

१. मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव.
२. मा.राज्यमंत्री,गृह (शहरे) यांचे खाजगी सचिव.
३. मा.राज्यमंत्री,गृह (ग्रामीण) यांचे खाजगी सचिव.
४. अपर मुख्य सचिव (गृह), गृह विभाग, मंत्रालय, मुंबई.
५. पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
६. प्रधान सचिव (विशेष), गृह विभाग, मंत्रालय, मुंबई.
७. अपर पोलीस महासंचालक, गुन्हे अन्वेषण विभाग, पुणे.
८. पोलीस आयुक्त, पुणे शहर.
९. अधिदान व लेखा अधिकारी,मुंबई.
१०.जिल्हा कोषागार अधिकारी, पुणे.
११.निवासी लेखा परीक्षा अधिकारी,वांद्रे,मुंबई.
१२.वित्त विभाग (व्यय-७)/वित्तिय सुधारणा-१.
१३.निवड नस्ती, पोल-३.